कर्जपुरवठ्याची नवी डिजिटल क्रांती

आज आपण एका क्लिकवर पैसे पाठवू शकतो; पण कर्ज मिळवताना अजूनही कागदपत्रांसाठी धावपळ करावी लागते. 'यूपीआय'ने पेमेंट सुलभ केले, आता कर्जपुरवठा सुलभ करण्याची वेळ आली आहे. डिजिटल व्यवहारांचा आधार घेऊन कर्ज देण्याची नवी संकल्पना पुढे येत आहे. 'युनिफाइड लेंडिंग इंटरफेस' अर्थात 'यूएलआय'मुळे हा बदल प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता आहे.

उमेश रेवणकर

matawealth

@timesofindia.com



'युनिफाइड पेमेंट इंटरफेस' अर्थात 'यूपीआय'चा भारतात सन २०१६ मध्ये शुभारंभ करण्यात आला. हेच 'यूपीआय' नंतर भारताच्या आर्थिक क्षेत्रात अतिशय व्यापक प्रमाणात स्थित्यंतर घडवून आणेल, याची कल्पना त्या वेळी फारच कमी जणांना होती. किंबहुना बहुतांश जणांना याबाबत पुसटशीही कल्पना नव्हती. निधी हस्तांतराची ही साधी सुटसुटीत प्रणाली नंतर साऱ्या जगाची डिजिटल पेमेंट प्रणाली बनली. 'यूपीआय'मुळे ग्राहकांच्या वर्तनात बदल झाला. त्याचबरोबर नवीन व्यवसायांना चालना मिळाली आणि आर्थिक समावेशनालासुद्धा गती मिळाली. 'यूपीआय'ने पैशाच्या देवाणघेवाण प्रक्रियेचे केवळ डिजिटायझेशनच केले नाही, तर या प्रक्रियेला सार्वत्रिक रूप प्रदान केले. 'यूपीआय'ने अनेक घटकांना एकमेकांशी जोडले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पैशाच्या देवाणघेवाणीला 'इस्टंट' बनवले.

कर्जपुरवठा क्षेत्रात भारत सध्या अशाच स्थित्यंतरातून जाण्याच्या तयारीत आहे. उदाहरणार्थ, डिजिटल पातळीवर प्रगती होऊनही, कर्ज मिळण्याची प्रक्रिया अजूनही संथ गतीने वाटचाल करीत आहे. ही प्रक्रिया विविध घटकांमध्ये विखुरलेली असून, आजही कागदपत्रांच्या पूर्ततेवर अवलंबून आहे. लाखो सूक्ष्म-उद्योजक, गिग कर्मचारी, शेतकरी आणि प्रथमच कर्ज घेणाऱ्यांसाठी कर्जाची मागणी ही अडचण नसून, आपली पात्रता सिद्ध करण्यासाठी योग्य आणि विश्वसनीय मार्ग उपलब्ध नसणे ही आहे. प्रस्तावित 'युनिफाइड लेंडिंग इंटरफेस' (यूएलआय) प्रणालीमुळे कर्जपुरवठा क्षेत्रातील या परिस्थितीत मोठी क्रांती घडण्याची शक्यता आहे.

पैशांच्या देवाणघेवाणीसाठी 'यूपीआय' विकसित करण्यात आले, त्याचप्रमाणे कर्ज देण्यासाठी एक समान डिजिटल स्तर म्हणून 'यूएलआय' विकसित करण्यात येत आहे. 'यूएलआय'ची संकल्पना मूळातच अतिशय सोपी आणि सुटसुटीत आहे. प्रत्येक कर्जदाराकडे एकच आणि त्याची संमती असलेली आणि सहज वापरता येईल अशी क्रेडिट ओळख अर्थात 'क्रेडिट आयडेंटिटी' असावी. संबंधित व्यक्तीची पतयोग्यता तपासण्यासाठी ही ओळख कोणतीही वित्तसंस्था हव्या त्या क्षणी वापरू शकेल. केवळ पारंपरिक 'क्रेडिट ब्यूरो'च्या माहितीवर अवलंबून न राहता वित्तसंस्था अनेक स्रोतांकडून अचूक माहिती मिळवू शकतील. या माहितीमध्ये संबंधित व्यक्तीच्या व्यवहारांचा इतिहास, त्याने भरलेला जीएसटी, त्याच्या अकाउंटशी संबंधित एकूण माहिती, युटिलिटी पेमेंट्स किंवा जमिनीच्या नोंदी आदींचा समावेश असेल. पारंपरिक कर्जप्रक्रियेच्या निकषांमुळे कायम अंधारात राहिलेली व्यक्ती तिच्या सविस्तर डिजिटल ओळखीमुळे शिवाय तिच्या आर्थिक स्थितीबद्दलच्या विश्वसनीय आणि खात्रीशीर माहितीमुळे प्रकाशझोतात येऊ शकेल.

ग्रामीण भागातील लघुउद्योगांसाठी अशा व्यावहारिक सुधारणा खूपच उपयुक्त आहेत. डिजिटल पद्धतीने स्वतःचा शेतमाल विकणारा किंवा बँक खात्यात अनुदानाचे पैसे मिळणाऱ्या शेतकऱ्याकडे स्वतःची पत सिद्ध करण्यासाठी पुरेशी आर्थिक उलाढाल त्याच्या बँक खात्यामुळे दिसत असते. तरीही, त्यांना अनेकदा प्रदीर्घ विलंबाचा सामना करावा लागतो. त्यांच्या जमिनीच्या मालकीची संथ गतीने होणारी पडताळणी, अनुदानाचे रेकॉर्ड किंवा बँक खात्याची माहिती वेगवेगळ्या प्रणालीमध्ये विखुरलेली असल्याने त्यांना कर्ज मिळण्यात विलंबाचा सामना करावा लागतो. ही सर्व माहिती एकत्रित करण्यात 'यूएलआय' अतिशय महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. कर्जाच्या मंजुरीसाठी पूर्वी कित्येक आठवडे वाट पाहावी लागणाऱ्या शेतकऱ्याला आता ही संपूर्ण प्रक्रिया काही मिनिटांत 'यूएलआय'मुळे पूर्ण करता येईल.

त्वरित कर्जाची सोय उपलब्ध

डिजिटल कर्जपुरवठ्याशी संबंधित 'क्रेडिट लाइन ऑन यूपीआय' अर्थात 'सीएलओयू' सारख्या उपक्रमांनी दैनंदिन व्यवहारांशी कर्जपुरवठा किती सहजपणे जोडू शकतो, हे सिद्ध केले आहे. रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०२३ मध्ये सुरू केलेल्या 'सीएलओयू'मुळे बँकांना थेट 'यूपीआय'द्वारे ग्राहकांना पूर्व-मंजूर कर्जपुरवठा करण्याची अनुमती मिळाली आहे. यामुळे ग्राहकांना गरजेच्या व्यवहारांवेळी त्वरित कर्जरूपी मदत उपलब्ध होत आहे. लघु व्यावसायिक किंवा उत्पन्नात चढउतार असलेल्या व्यक्तींसाठी ही सुविधा अतिशय उपयुक्त ठरली आहे. पारंपरिक पद्धतीने कर्ज मिळण्यात होणारा विलंब टळला आहे, त्याचबरोबर कागदपत्रांच्या पूर्ततेचे कोणतेही ओझे त्यांना बाळगावे लागत नाही. आज आवश्यक वस्तूंची खरेदी करून नंतर सोयीनुसार परतफेड करण्याची क्षमता या छोट्या व्यक्तींना मिळाली आहे. 'सीएलओयू'ला ताकदवान बनवणारी मुख्य बाब म्हणजे, लाखो व्यक्ती दररोज वापरत असलेल्या 'यूपीआय'सारख्या आर्थिक यंत्रणेशी तो जोडली गेली आहे.

सूक्ष्म-उद्योजक आवश्यक माल खरेदी करताना, गिग कर्मचारी तातडीचा खर्च भागवताना किंवा छोटे व्यापारी रोख रकमेचे व्यवस्थापन करताना आता साध्या 'यूपीआय' व्यवहारांद्वारे पूर्व-मंजूर कर्जाची मदत घेऊ शकतात. हा कर्जपुरवठा नेहमीच्या आर्थिक व्यवहारांप्रमाणेच काम करतो. यात बँक खात्यातील शिल्लकीमधून निधी येत नाही, तर तो पूर्व-मंजूर कर्जमर्यादेच्या सुविधेमुळे प्राप्त होतो. कर्जाची परतफेड याच त्यांना परिचित असलेल्या डिजिटल सुविधेतून होते. अनेकदा ही परतफेड कर्जदाराच्या उत्पन्नानुसार अतिशय लवचीक वेळापत्रकानुसार करता येते. कर्जवितरणाचे हे नवीन प्रारूप यापूर्वी कर्ज मिळण्यापासून वंचित राहिलेल्या घटकांसाठी खूप उपयुक्त ठरले आहे.

'सीएलओयू' प्रणाली विद्यमान 'यूपीआय' व्यवहारांचा डेटा, परतफेडीचा इतिहास आणि डिजिटल माहितीचा आधार घेते. त्यामुळे वित्तसंस्था आता संबंधित व्यक्तीच्या जोखमीचे अधिक अचूक मोजमाप करू शकतात आणि ज्या व्यक्तींकडे पारंपरिक क्रेडिट स्कोअर नाही, त्यांनाही कर्ज देऊ शकतात. एवढेच नव्हे तर हे प्रारूप ज्यांना कधीही क्रेडिट कार्ड मिळाले नाही, त्यांनाही क्रेडिट कार्ड उपलब्ध करून देते. अर्थात ही सर्व प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने, कमी खर्चात आणि अधिक काटकोरपणे केली जाते.

योग्य दरात कर्जाचा मार्ग मोकळा

'यूएलआय'मधील खरे परिवर्तन विविध घटकांदरम्यान त्याचा सहज वापर करण्यामध्ये दडलेले आहे. 'यूपीआय'मध्ये निधी हस्तांतरांसाठी कोणतेही ॲप किंवा बँक खाते वापरता येऊ शकते, त्याचप्रमाणे 'यूएलआय' कर्जदारांना वित्तपुरवठ्यासाठी कोणत्याही वित्तसंस्थांकडे जाण्याची मुभा देते. यात त्यांना नव्याने माहिती सादर करण्याची प्रक्रिया पुन्हा करत बसावी लागत नाही. डिजिटल आर्थिक व्यवहारांचा अतिशय सक्षम इतिहास असलेल्या ट्रक ऑपरेटरला अतिशय योग्य दरात त्वरित कर्ज मिळू शकते. अनेक प्लॅटफॉर्मवरून कमाई करणाऱ्या गिग कामगाराचे मूल्यांकन त्यांच्या कागदपत्रांच्या माहितीपेक्षा त्यांच्या वास्तविक उत्पन्नाद्वारे केले जाऊ शकते. एक लहान व्यापारी आपली अतिरिक्त मालमत्ता गहाण न ठेवता धरणा केलेल्या जीएसटीच्या माहितीआधारे मालमत्ता पत (इनकॅटरी क्रेडिट) वाढवू शकतो. असे स्वातंत्र्य निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देते, व्याजदरात सुधारणा घडवून आणते आणि ग्राहकांना त्यांच्या जोखीमेनुसार कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा करते.

पतसंस्कृती सक्षम होण्यावर भर

वित्तसंस्थांसाठी, विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये व्यापक स्वरूपात कार्यरत असलेल्या 'एनबीएफसी'ना वंचित कर्जदारांपर्यंत अधिक आत्मविश्वासाने पोहोचण्याची संधी 'यूएलआय'ने देऊ केली आहे. चांगल्या माहितीमुळे जोखमीचा अंदाज अधिक अचूकपणे बांधता येत आहे. स्वयंचलित तपासणीमुळे कागदपत्रांवरील ताण कमी होत आहे. ग्राहकांच्या संमतीवर आधारलेल्या माहितीची देवाणघेवाण ग्राहक आणि वित्तसंस्था यांच्यात विश्वासाचे बंध अधिक घट्ट करत आहे. औपचारिक पतप्रणालीमध्ये अधिकाधिक कर्जदार सामील होत आहेत, तसतसे ग्राहकांच्या परतफेडीच्या सवयींचा मागोवा घेणे सोपे होत आहे. या बदलेल्या स्थितीमुळे भारताची एकूण पतसंस्कृती दिवसेंदिवस अधिकाधिक सक्षम होताना दिसत आहे. 'यूएलआय'मुळे भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये नवा स्तर तयार झाला आहे. जनधन, आधार आणि मोबाइल कनेक्टिविटीमुळे वित्तीय पर्याय सहज उपलब्ध झाले आहेत. 'यूपीआय'मुळे आर्थिक जगतातील सहभाग वाढला आहे. आता कर्जदारांना पतपुरवठ्यासाठी पात्र होण्याची योग्य संधी देण्याबरोबरच त्यांना चोख सेवा देण्यासाठी वित्तसंस्थांना डिजिटलरूपे साधने 'यूएलआय'मुळे मिळाली आहेत. हे विविध स्तर भारताच्या सर्वसमावेशक आर्थिक वाढीच्या भविष्यातील टप्प्याला अधिक चालना देऊ शकतात.

'यूपीआय'ने डिजिटल पेमेंट अत्यंत सोपे, सुटसुटीत केले. 'सीएलओयू'सारख्या उपक्रमांनी कर्ज घेण्याची प्रक्रिया अधिक सोपी केली. आता 'यूएलआय' ते अधिक न्याय्य बनवू शकते. कर्जपुरवठा आर्थिक व्यवहारांइतकाच सुलभ होईल, तेव्हा त्याचा केवळ आर्थिक परिणामच दिसणार नाही; तर तो परिवर्तनकारी राहील. त्यामुळे रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होतील, प्रगतीला गती मिळेल आणि लाखो भारतीयांना देशाच्या विकासगाथेत आत्मविश्वासाने सहभागी होता येईल.

(लेखक श्रीराम फायनान्सचे कार्यकारी उपाध्यक्ष आहेत.)